## शिक्षण मंडळ कार्यालय,पुणे महानगरपालिका
## कै.भाऊसाहेब शिरोळे भवन,जुना तोफखाना
## निविदा क्रमांक२२

शिक्षण मंडळ,पुणे महानगरपालिका यांचेकडून खालील तपशीलात नमूद केलेल्या बाबींसाठी एक लिफाफा (**one Bid System**) सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा अर्जासोबत निविदा अटी व इतर सविस्तर माहिती वरील पत्त्यावर समक्ष मिळेल पोष्टाने माहिती पाठविली जाणार नाही व पोष्टाने आलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.

१. **कोरे निविदा प्रपत्र विक्री** —निविदा सूचना प्रसिध्द झाल्यापासून मंगळवार दिनांक २९/१२/२००९पासून गुरूवार दिनांक ३१/१२/२००९ पर्यन्त कार्यालयीन दिवशी कार्यालयीन वेळेत.

२.**निविदा व बयाणा स्विकृतीची तारीख व वेळ** — निविदा सूचना प्रसिध्द झाल्यापासून शुक्रवार दिनांक १/१/२०१० रोजी दुपारी १.००वाजे पर्यन्त

३.**निविदा उघडण्याची तारीख व वेळ** — शुक्रवार दिनांक १/१/२०१० रोजी दुपारी ३.००वाजता किंवा कार्यालयीन सोयीनुसार निविदा भरणाऱ्यांच्या किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

४.**निविदा दर** — सर्व करांसह देणे आवश्यक आहे.

५.शिक्षण मंडळ,पुणे मनपाचे करिता शैक्षणिक वर्ष २००९—१० अखेर करावयाच्या बाबी व त्याचा तपशील.

| अ | तपशील | रुपये | फॉर्म किंमत |
|---|---|---|---|
| १ | अंतिम क्रीडा स्पर्धा भोजन व नाष्टा | ५,००,०००/— | १,०००/— |

**सूचना**—१. निविदा भरताना बयाणा रक्कम शेकडा १ टक्का व निविदा मान्य झाल्यावर शेकडा ५ टक्के अनामत रक्कम भरणे आवश्यक आहे.

२. कोणतीही निविदा स्विकारणे व नाकारणे हा शिक्षण मंडळाने स्थापन केलेल्या खरेदी समितीचा अधिकार आहे व राहिल.

३. सदर निविदा त्या संबधीची सर्व माहिती पुणे मनपाच्या वेबसाईट www.pune corporation.org वर प्रसिध्द करण्यात आलेली आहे व शिक्षण मंडळाचे नोटीस बोर्डवर प्रसिध्द केली आहे.

**स्वाक्षरी/—**
**अध्यक्ष,**
**शिक्षण मंडळ,पुणे मनपा**

**स्वाक्षरी/—**
**शिक्षण प्रमुख,**
**शिक्षण मंडळ,पुणे मनपा**

शिक्षण मंडळ , पुणे महानगरपालिका .
स्पेसिफीकेशन २००९-१०
निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख १ /१/२०१०
वेळ दुपारी १ .०० वाजेपर्यंत
बयाणा रक्कम रू.५०००/-

## अंतिम क्रीडा स्पर्धा भोजन व नाष्टा

आतंरशालेय अंतिम क्रिडा स्पर्धा दिनांक ५ व ६ जानेवारी २०१० रोजी मनपा शाळा क्रं.८७ बी औंध (इंदिरा गांधी प्राथ.विद्या मंदिर)येथे आयोजित करण्यात आलेली आहे.

दि.५/१/२०१० रोजी सदर स्पर्धेत ३१०८ विद्यार्थी व ४२८ शिक्षक व अशे एकूण ३५३६ तसेच दि.६/१/२०१० रोजी ७२० विद्यार्थी व ३६० शिक्षक व इतर अशे एकूण ४६१६ ची भोजन व नाष्टयाची व्यवस्था करावयाची आहे.
भोजन व नाष्टयाचे पदार्थ

**दिनांक.५/१/२०१०**
नाष्टा -चहा/दूध/उपमा/शिरा (पुरेसा नाष्टा)
भोजन(पोटभर)-चपाती,मसाला भात,पालक पनिर, मटकी(लपथपीत), पापड लोणचे व गुलाब जामुन

**दिनांक.६/१/२०१०**
नाष्टा -चहा/दूध/उपमा/शिरा/पोहे(पुरेसा नाष्टा)
दुपारचे भोजन (पोटभर)- पुरी, गुलाब जामुन बैगंन मसाला,चटणी पापड लोणचे व वरण-भात, डॉलर जिलेबी.

वरील पदार्थ खाल्यामुळे अपाय होणार नाही याची जबाबदारी पुरवठा दारावर राहिल.वरील सर्व पदार्था करिता वापरण्यात येणारे सर्व घटक पदार्थ आय.एस. आय. मार्कचे असावेत. भोजन व नाष्टा प्रोटिन व कॅलरीज ने परिपूर्ण असावे

वरील प्रमाणे १ दिवसाचा नाष्टा व भोजनाचा प्रत्येकी एका थाळीचा सर्व करासह दर दयावा. निविदेसोबत आरोग्य विभागाकडील परवाना जोडावा.

**स्वाक्षरी/-**
**अध्यक्ष,**
**शिक्षण मंडळ,पुणे मनपा**

**स्वाक्षरी/-**
**शिक्षण प्रमुख,**
**शिक्षण मंडळ,पुणे मनपा**

## शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका
## शिवाजी नगर, पुणे ४११००५
## अंतिम क्रीडा स्पर्धा भोजन व नाष्टा
## पुरविणेकामी निविदा अटी व शर्ती २००९–१०.

१.संदर्भ:–

पुणे दैनिक पुढारी व दैनिक सांजवार्ता दि.२९/१२/२००९ मधील प्रसिध्द झालेल्या जाहीर निविदा क्रं.२२, अंतिम क्रीडा स्पर्धा भोजन व नाष्टा पुरवविणेकामी **विहीत नमुन्यातील निवीदा फॉर्म व निवीदा खालीलप्रमाणे:–**

शिक्षण मंडळ पुणे म.न.पा, पुणे व त्यांनी नियुक्त व अधिकृत केलेल्या **खरेदी समितीने** शैक्षणिक आर्थिक वर्ष २००९–१० चे करिता खालील **परिशिष्ठ अ** मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीस अनुसरून, अंतिम क्रीडा स्पर्धा भोजन व नाष्टा पुरवठयासाठी निवीदा अटी,शर्ती व स्पेसिफिकेशन खालील प्रमाणे.

**परिशिष्ठ अ**

**१. अटी व शर्ती :–**

१.निवीदा सीलबंद असली पाहिजे. दिलेल्या मुदतीत व वेळेत निवीदा आली नाही तर ती स्विकारली जाणार नाही.

२.निविदेसाठी एक लिफाफा पध्द्त असुन पाकीटमध्ये खालील साक्षांकित कागदपत्रे सादर करावयाची आहेत.

**२पाकीटात सादर करावयाची कागदपत्रे.**

**अ)** निवीदा रकमेच्या शेकडा १% या दराने बयाणा रक्कम म्हणून राष्ट्रीयकृत बॅकेचा मा.शिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे म.न.पा, पुणे यांचे नावे काढलेल्या धनाकर्ष (DD) कार्यालयात चलनाने भरणा करावा, २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयानुसार परिशिष्ट १२ अन्वये संबंधित लघुउद्योगाकडे अधिकृत पुरवठादार असल्याचे विकास आयुक्त, उद्योग व भांडार यांचे अधिकृत नोंदणी असल्याबाबतचे चालू वर्षाचे पत्र सोबत जोडले तरच निवीदादारास बयाणा रक्कम व अनामत रकमेमध्ये सुट मिळेल अन्यथा त्याला एस.एस.आय.युनिट असेल तरीसुध्दा वरील रकमा भराव्या लागतील.

**ब) निवीदादाराचे संस्था नोंदणी केलेले अद्ययावत प्रमाणपत्र.**

**क)** नवीदादाराचे आयकर खात्याकडे नोंदणी केल्याचा नोंदणी प्रमाण पत्राची (Pan No.) छायांकित प्रत.

**ड)** निविदादाराची निविदाकामाची पूर्तता करण्यासंबंधी आर्थिक क्षमता असल्याबाबतची बॅकेचे प्रमाणपत्र, निविदेच्या एकूण किमतीच्या किमान २५ टक्के रकमेचे .

**इ)** पाकीटात सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती पाकीट उघडताना शिक्षण मंडळाचे कार्यालयास तपासणीचे कामी सादर कराव्या लागतील.

३.निविदा धारकाने बाब निहाय सर्व करासह दर भरावेत व पाकीटावर निवीदा धारकाचे नाव पत्ता व निवीदा क्रं.नमुद करून पाकीट सिलबंद करून सादर करावे.

**४.निवीदादाराने पुर्तता करावयाच्या अटी व शर्ती.**

१.निविदा स्वच्छ व स्पष्ट अक्षरात लिहिलेली असावी. मनपा प्राथमिक शाळांतील अंतिम क्रीडा स्पर्धा भोजन व नाष्टा पुरविणेचे दर अंकी व अक्षरी लिहावेत.

२.निवीदा स्विकारण्याचा, नाकारण्याचा पुर्ण अगर अशंत: मंजुर करण्याचा सर्वस्वी अधिकार खरेदी समितीस आहे.

३.निविदाकरिता मंजूर व जाहीर केलेल्या रकमेत संख्येत बदल करण्याचा अधिकार खरेदी समितीस आहे.

४.मान्य निवीदा धारकास निविदा दर स्विकृती मिळाल्यापासुन त्वरीत शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या नियमानुसार सर्वसाधारण मुद्राकावर करार करणे बंधनकारक आहे.करार करण्यास निविदादाराने असमर्थता दर्शविल्यास बयाण रक्कम जप्त करण्यात येईल. प्रसंगी शिक्षण मंडळास सदर प्रक्रियेतुन काही नुकसान झाले असल्यास तीही रक्कम संबधितांकडून वसूल करण्यात येईल.

.५मान्य निवीदादारास करार करतेवेळी मनपा प्राथमिक शाळांतील अंतिम क्रीडा स्पर्धा भोजन व नाष्टा पुरविणेचे एकूण किंमतीच्या ५ % रक्कम सुरक्षा/अनामत रक्कम म्हणून शिक्षण मंडळाकडे धनाकर्ष (DD) ने भरावी लागेल.

६.निवीदेतील मान्य दर फक्त आर्थिक वर्ष २००९–१० करिताच करार केल्यापासून बंधन कारक राहतील.

७.निवीदा फॉर्मनुसार अंतिम क्रीडा स्पर्धा भोजन व नाष्टा पुरविणेचे दर भरण्यात आलेले आहेत.त्याचे नमुने निवीदादाराने स्वखर्चाने निवीदा सोबत दयावयाचा आहे. सदर नमुना खरेदी करावयाची जबाबदारी किंवा त्या कामी असलेला खर्च देण्याची जबाबदारी मा.शिक्षण मंडळावर नाही. नमुना दिल्याशिवाय निवीदा स्विकारता येणार नाही.

८.बयाणा रक्कम व अनामत रक्कम पूर्णपणे एकमेकांपासून वेगळया आहेत. सदर रकमांवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

९.मनपा प्राथमिक शाळांतील अंतिम क्रीडा स्पर्धा भोजन व नाष्टा पुरविणेचे पुरविण्याकरिता करारनाम्यात दिलेली मुदत कोणत्याही परिस्थितीत वाढवून मिळणार नाही. सदर मुदत करारनाम्याची विशेष व महत्वाची अट राहिल. मात्र विशेष परिस्थितीत दिलेली मुदत वाढविण्याचा अधिकार मा. खरेदी समितीस राहिल.

१०दिलेल्या मुदतीत स्पेसिफिकेशन प्रमाणे मनपा प्राथमिक शाळांतील अंतिम क्रीडा स्पर्धा भोजन व नाष्टा न पुरविल्यास निविदादराची अनामत रक्कम जप्त केली जाईल. प्रसंगी निवीदादारास ब्लॅकलिस्ट करण्याचा अधिकार मा. खरेदी समितीस आहे व राहिल. वेळी व प्रसंगी नुकसान भरपाई मागणीचा अर्ज संबधित ठेकेदाराविरूध्द् लवादाकडे सादर केला जाईल व त्याच्या खर्चास व परिणामास संबंधितास जबाबदार धरले जाईल.

११करारनाम्यानुसार पुरवठा करावयाचे अंतिम क्रीडा स्पर्धा भोजन व नाष्टा मनपा शा.क्र ८७ बी, औंध येथे स्वखर्चाने जकातीच्या रकमेसह पोहचविण्याची जबाबदारी निविदादारावर आहे.

१२.करारनाम्यानुसार स्पेसिफिकेशननुसार मुदतीत अंतिम क्रीडा स्पर्धा भोजन व नाष्टा पुरविण्यात न आल्यास तो स्विकारली जाणार नाही त्या मालाची जबाबदारी मा.शिक्षण मंडळावर राहणार नाही किंबहुना शिक्षण मंडळ संबधित नाकारलेल्या मालाची विल्हेवाट मनमानेल त्याप्रमाणे करेल.

१३.पुरवठा केलेल सर्व भोजन व नाष्टा तपासून घेवून दिलेल्या नमुन्या प्रमाणे सर्व भोजन व नाष्टा असल्याची खात्री मा.खरेदी समितीस झाल्याशिवाय बिल मिळणार नाही.कोणत्याही स्वरूपात हप्त्याचे

आगाऊ बिल मिळणार नाही. कोणासही ॲडव्हान्स रक्कमेची मागणी करता येणार नाही तसेच देय बिलातून आयकर कलम १९४ सी नुसार टीडीएसच्या रकमेची कपात केली जाईल.

१४.एकदा भरलेली निवीदा रदद् करता येणार नाही एखादयाला ती जर रदद् करावयाची असेल तर त्याची संपूर्ण बयाणा रक्कम जप्त करण्याचा अधिकार खरेदी समितीस राहिल तसेच सदरची निविदा दुसऱ्या ठेकेदारास दिल्यानंतर बिलातील येणारा जादा फरक दंड म्हणून वसूल करण्यात येईल.

१५. मा.शिक्षण मंडळाने निविदेमध्ये नमुद केलेले काम मंजुर निविदादारास दिल्यानंतर इतर निविदादारांची बयाणा रक्कम चेकने परत दिली जाईल. त्यापूर्वी कोणासही बयाणा रक्कम भरल्याची मुळ पावती मागणी अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१६. अंतिम क्रीडा स्पर्धा भोजन व नाष्टा पुरविण्याबाबत काही वाद निर्माण झाल्यास तो करारनाम्यानुसार लवादाचा विषय असेल व उभय पक्षाला संबधित वाद निर्णयाकरिता लवादाकडेच पाठवावा लागेल.

१७ निविदा एकास/अनेकास देणे किंवा विभागून देण्याचा अधिकार खरेदी समितीस आहे.

१८. अंतिम क्रीडा स्पर्धा भोजन व नाष्टा सांगितलेल्या शाळेत पुरविल्यानंतर त्याची खरेदी समितीकडून पाहणी करण्यात येईल. दिलेला भोजन व नाष्टा विहित नमुन्यात आहेत किंवा नाही हे पाहिले जाईल खराब किंवा स्पेसिफिकेशन प्रमाणे नसलेला भोजन व नाष्टा कोणत्याही परिस्थितीत स्विकारला जाणार नाही.

१९. निविदादाराचे स्पेसिफिकेशन प्रमाणे किंवा पुरविलेल्या भोजन व नाष्टा बाबत खरेदी समितीस काही शंका आली तर त्याची गुणवत्तेची तपासणी सक्षम लॅब कडून करण्यात येईल.व त्याची खर्चाची सर्वस्वी जबाबदारी निविदादारावरच राहिल.

२०. मंजुर केलेल्या अधिकृत नमुन्याप्रमाणे व ठरवून दिलेल्या मुदतीत पुरवठा झाल्यानंतर पुरवठा केलेल्या अंतिम क्रीडा स्पर्धा भोजन व नाष्टा एकत्रित देयक मा.शिक्षण प्रमुख शिक्षण मंडळ पुणे म.न.पा.पुणे यांच्या नावे या कार्यालयात सादर करावे लागेल. भोजन व नाष्टा पुरवठा करताना प्राप्त केलेली चलन्स संबधितांकडून स्वाक्षरी व शिक्यासह

देयकासमवेत सादर करावी लागतील त्याशिवाय कोणत्याही परिस्थितीत बिल देण्याबाबत कार्यवाही केली जाणार नाही.

२१. निविदा दिनांक १/१/२०१०रोजी दुपारी ३ वाजता उघडण्यात येतील.वेळी व त्याप्रसंगी ठेकेदार स्वत: किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहू शकतील. प्रशासकीय कारणास्तव त्या दिवशी निविदा न उघडलयास निविदा उघडण्याचा नवीन दिनांक सहभागी निविदादारास दूरध्वनी वरुन कळविण्यात येईल. वेळी व त्याप्रसंगी निविदादारास हजर रहावे लागेल त्याकामी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

पुणे

| | |
|---|---|
| **स्वाक्षरी/—** | **स्वाक्षरी/—** |
| **अध्यक्ष,** | **शिक्षण प्रमुख,** |
| **शिक्षण मंडळ,पुणे मनपा** | **शिक्षण मंडळ,पुणे मनपा** |

———————————————————————————————————————

प्रतिज्ञालेख

मी,श्री.——————————————————————वय———वर्ष

व्यवसाय—धंदा,राहणार———————————————————————

निविदादार सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,वरील निवीदेच्या,फॉर्म सोबतच्या अटी व शर्ती काळजीपुर्वक वाचल्या असून त्या सर्व मला व माझ्या संस्थेला मान्य आहेत. त्यानुसारच निवीदा भरलेली आहे व निवीदासोबत मला अटी व शर्ती मान्य आहेत. म्हणून सदर प्रतिज्ञापत्रावर आज रोजी पुणे येथे सही करुन निवीदेसोबत दाखल करित आहे.

**पुणे**

**दिनांक:—**

**पुरवठा धारकाची सही व शिक्का**